ePaper

# तृतीयपंथीयांना अर्जासाठी दिरंगाई, हायकोर्टाचे राज्य सरकारला खडेबोल



| वर्ष - 6 | अंक - 235 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



**आतील पानांत**

- चिखलीत विकास साने 'रॉक'; राष्ट्रवादी, भाजपाला 'शॉक'
- मोशी येथील पाणी प्रश्न कायमस्वरुपी निकाली
- गुजरात विधानसभा निवडणूकीतील विजयानंतर कोल्हापुरात भाजपाचा



www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक 9 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# ...तर महाराष्ट्र बंद!

## संभाजीराजे छत्रपती : सर्वपक्षीय बंदला संमिश्र प्रतिसाद

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल आज पिंपरी चिंचवड बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला सर्वपक्षीय पाठिंबा मिळाला असून, नागरिकांचा सुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. यावेळी संभाजीराजे छत्रपती यांनी आंदोलकांना संबोधित केले.**



आंदोलकांना संबोधित करताना संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज ही आपली अस्मिता आहे. जे कोणी हे मानत नाही त्यांचा कडेलोट होतो. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती महाराजांबाबत दोनवेळा वादग्रस्ते विधाने केली आहेत. तरी देखील त्यांनी साधी दिलगिरी सुद्धा व्यक्त केलेली नाही. कसली एवढी मग्रुरी आहे हे कळत नाही. आता यांनी दिलगिरी व्यक्त केली तरी आता आम्ही ती मान्य करणार नाही.

म्हाला हा राज्यपाल नको, त्याला महाराष्ट्रातून बाहेर पाठवून द्या. हे जर घडले नाही तर महाराष्ट्र बंद शिवाय पर्याय नाही. राज्यपालानंतर तीन व्यक्तींनी छत्रपतींचा अवमान केला. किती दिवस हे सहन करायचे कधीतरी पक्षाच्या पुढे पाहिले पाहिजे. महाराष्ट्र बंदचा माझ्यावर दवाब होता. पण, लोकांना वेठीस धरायला नको म्हणून मी याबद्दल घोषणा केली नाही. आजच्या बंदमध्ये दोन पक्षांचे लोक सहभागी झाले नाहीत मी जर त्या पक्षांशी निगडित असतो, तर पक्षाचा दवाब झुगारून बंद मध्ये सहभागी होण्यासाठी आलो असतो, असेही संभाजीराजे छत्रपती म्हणाले.

### राज्यपालांची हकालपट्टी करा...

छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या राज्यपाल हटवण्याच्या मागणी संदर्भात विचारले असता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, त्यांनी योग्य ठिकाणी ती पोहचवली आहे. याबाबत छत्रपती संभाजीराजे म्हणाले की, "प्रधान मंत्री व राष्ट्रपतींच्या माध्यमातून नेमणूक होते. देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा हा विषय का ठेवला आहे. परवा माझ्या कानावर आले की ते म्हटले आम्ही ज्या ठिकाणी विषय पोहोचवायचा त्या ठिकाणी पोहोचवला आहे. काय विषय पोहचवला तुम्ही ते सांगा. कुठे पोहचवला ते सांगू नका. या कोश्यारींची हकालपट्टी करा."

# रहाटणी येथील इमारतीला आग

## अग्निशमन विभागाची सतर्कता : कोणतीही जीवितहानी नाही

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

रहाटणी येथील शिवार चौकातील रेनबो प्लाझा या इमारतीत गुरुवारी दुपारी साडेचारच्या सुमारास अचानक आग लागली. पाच मजली या इमारती हॉटेल तसेच विविध व्यावसायिक कार्यालय आहे. या कार्यालयांमध्ये काही कर्मचारी व नागरिक अडकले. त्यांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी अग्निशामक दलाच्या जवानांकडून अशा व्यक्तीचे प्रयत्न सुरू आहेत.

**इमारतीच्या इलेक्ट्रिक केबलसाठी असलेल्या डक्टमधून धूर निघत असल्याचे काही जणांच्या निदर्शनास आले. पाहणी केली असता आग लागल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे इमारतीमधील सर्व कार्यालयांमधील कर्मचारी व नागरिकांना इमारती मधून बाहेर पडण्यासाठी आवाहन करण्यात आले. आग वाढल्याने इमारतीत मोठ्या प्रमाणात धूर झाला.**

इमारतीच्या इलेक्ट्रिक केबलसाठी असलेल्या डक्टमधून धूर निघत असल्याचे काही जणांच्या निदर्शनास आले. पाहणी केली असता आग लागल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे इमारतीमधील सर्व कार्यालयांमधील कर्मचारी व नागरिकांना इमारती मधून बाहेर पडण्यासाठी आवाहन करण्यात आले. आग वाढल्याने इमारतीत मोठ्या प्रमाणात धूर झाला.

याबाबत माहिती मिळताच अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाच्या जवानांनी पाणी फवारून धूर कमी करण्याचा प्रयत्न केला. तसेच इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर काच फोडून इमारतीत प्रवेश केला. त्यानंतर नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू असून आग नियंत्रणात आणण्यासाठी कसरत केली जात आहे.

दरम्यान, शिवार चौकात मोठी गर्दी झाली. वाहतूक पोलीस व सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय पदाधिकाऱ्यांनी मदतीसाठी पुढाकार घेत वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला.



# चिखलीत विकास साने 'रॉक'; राष्ट्रवादी, भाजपाला 'शॉक'!


## पाणीप्रश्न पेटला : गाव समाविष्ट झाल्यापासून वणवण

पिंपरी । । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत चिखली गावचा समावेश झाल्यापासून गावाला विकासापासून वंचित आहे. पायाभूत सुविधांसाठी नागरिकांना वणवण करावी लागत आहे. आणखी किती दिवस हा अन्याय सहन कराणार? असा सवाल उपस्थित करीत सामाजिक कार्यकर्ते विकास साने यांनी पाणी प्रश्नावरुन अक्षरश: रान पेटवले आहे.**

चिखली गावचा समावेश महापालिका हद्दीत होवून आता २० वर्षे होत आली. मात्र,आजही चिखलीकरांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. रस्त्यांची दुरावस्था झाली असून, अनियमित वीजपुरवठ्याची समस्या 'जैसे थे' आहे. अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे.

दरम्यान, चिखली गावातील सुमारे ८ हेक्टर जमीन संपादित करुन पिंपरी-चिंचवडचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले. मात्र, या केंद्रातून चिखलीला पाणी देण्यात येणार नाही, असा दावा करीत विकास साने यांनी 'फेसबूक लाईव्ह' केले. त्यामुळे चिखलीच्या विकासाचा मुद्दा चव्हाट्यावर आला आहे. वास्तविक, चिखली गावापुरता विचार केला असता गाव समाविष्ट झाल्यापासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची १५ वर्षे आणि भाजपाची ५ वर्षे शहरात सत्ता आहे. गेल्या २० वर्षांत गावात पायाभूत सोयी-सुविधा निर्माण झाल्या नसतील.त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते विकास साने यांना 'रॉकिंग स्टाईल' आंदोलन करावे आहे, ही बाब राष्ट्रवादी आणि भाजपाच्या नेत्यांना चिंतन करायला लावणारी आहे.




### यश साने यांनी सावध भूमिका...

दुसरीकडे, माजी विरोधी पक्षनेते दत्ताकाका साने यांचे चिरंजीव आणि राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष यश साने यांनी या प्रकरणावर थेट भाष्य करणे टाळले आहे. चिखली गावचा समावेश महापालिका हद्दीत झाल्यापासून पायाभूत सुविधा मिळाल्या नाहीत, असे म्हणता येणार नाही. स्व. काकांच्या काळात अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. मात्र, विकास साने यांनी घेतलेल्या भूमिकेची पूर्ण कल्पना नाही. मी सध्या बाहेरगावी आहे. माहिती घेवून माझी भूमिका स्पष्ट करेन, असा सावध पवित्रा यश साने यांनी घेतला आहे.

### राष्ट्रवादीला घरचा आहेर?

चिखलीतून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे माजी विरोधी पक्षनेते स्व. दत्ताकाका साने यांनी 'तीन टर्म' म्हणजे तब्बल १५ वर्षे महापालिका गाजवली आहे. अनेक विकासकामांत साने यांचे योगदान आहे. तसेच, राष्ट्रवादीचे समर्थक स्वाती साने यांनीही चिखलीचे पाच वर्षे नेतृत्व केले आहे.

त्यामुळे १५ वर्षे राष्ट्रवादीच्या उमेदवारांकडे चिखलीची धुरा असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादीची सत्ता असताना चिखली विकासापासून वंचित कशी? हे राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांचे अपयश आहे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच, विकास साने आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार? अशी चर्चा असताना ऐन निवडणुकीच्या तोंडावर साने यांनी केले आंदोलन म्हणजे राष्ट्रवादीला 'घरचा आहेर' मानला जात आहे.

### भाजपाची भूमिका काय?

दरम्यान, विकास साने यांनी 'सोशल मीडिया' वर ट्रायल घेतल्यानंतर भारतीय जनता पार्टीचे गावातील आजी-माजी आणि इच्छुक उमेदवार एकवटले आहेत. चिखली जलशुद्धीकरण केंद्रातील पाणी समाविष्ट गावांसह पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागवणार आहे. चिखलीला या केंद्रातून पाणी मिळणार नाही, असा दावा निव्वळ दिशाभूल करणारा आहे, असा प्रतिदावा भाजपाकडून करण्यात आला. त्यासाठी माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, सुरेश म्हेत्रे, विनायक मोरे, दिनेश यादव, संतोष मोरे, अंकुश मळेकर यांनी 'फेसबुक लाईव्ह' केले. त्यामध्ये महापालिका प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांनी चिखलीकरांना आश्वासित केले. जलशुद्धीकरण केंद्रातील पाण्यामुळे चिखली, मोशी, चऱ्होली, डुडुळगाव यासह समाविष्ट गावांत पाणी समस्या सुटण्यास मदत होईल. त्यामुळे भूलथापांना बळी पडू नका, असे आवाहनही करण्यात आले.

# गोरक्षकांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ जुन्नरला निषेध मोर्चा!

जुन्नर । । महाईन्यूज । प्रतिनिधी।



जुन्नर शहरातील भरवस्तीत जमावाने गोरक्षकांवर केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आज गुरुवार ता.०८ रोजी निषेध मोर्चा काढण्यात आला तसेच शहरात सकाळपासून कडकडीत बंद पाळण्यात आला. अत्यावश्यक वैद्यकीय सेवा,सार्वजनिक वाहतूक, शैक्षणिक संस्था, बँका वगळता व्यापारी, तसेच दैनंदिन भाजी विक्रेते यांनी देखील आपला व्यवसाय पूर्ण बंद ठेवत पाठींबा दिला.

जुन्नरच्या श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार येथे शहर व परिसरातील गोरक्षक, शिवभक्त मोठ्या संख्येने जमा झाले येथून निषेध मोर्चाची सुरवात होऊन तहसील कार्यालयाच्या आवारात सांगता झाली. यावेळी अखिल भारत कृषी गो सेवा संघ पश्चिम महाराष्ट्रचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे, मानद पशु कल्याण अधिकारी शिवशंकर स्वामी, भाजपा नेत्या आशा बुचके, सह्याद्री प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व दुर्ग संवर्धक श्रमिक गोजमगुंडे, संतोष खामकर, मधुकर काजळे, अरुण कबाडी, सुनिल काळे, शिवराज संगनाळे, मयुर दिवेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवजन्मभूमीत गोहत्या करून पावित्र्य बिघडवू पाहणारे तसेच महिलांची छेडछाड करणाऱ्या शक्तीच्या विरोधात कठोर भूमिका घेऊन त्यांना धडा शिकविण्यात येईल. हल्ल्यातील आरोपींना पोलीस प्रशासनाने त्वरित अटक करावी अन्यथा मोठे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मिलिंद एकबोटे यांनी यावेळी बोलताना दिला.

जुन्नर शहरात संपूर्ण गोवंश बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी,लव्ह जिहाद निर्बंध कायदा लागू करावा, धर्मांतर बंदी,शेतकऱ्यांच्या गाई, बैल चोरी करणाऱ्या टोळीवर कडक कारवाई, संवेदनशील शहर म्हणून अधिकची पोलीस चौकी उभारावी आदी मागण्यांचे निवेदन उपविभागीय पोलीस अधिकारी मंदार जवळे, तहसिलदार रवींद्र सबनीस यांना देण्यात आले.

# मोशी येथील पाणी प्रश्न कायमस्वरुपी निकाली!

## रहिवाशांना दिलासा: आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

पिंपरी ।
।महाईन्यूज ।

**मोशी येथील शिवाजीवाडी येथे मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारले गेल्याने या ठिकाणी लोकसंख्या वाढलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेची पाणीपुरवठ्याची यंत्रणा तोकडी पडत होती. परिणामी, गृहनिर्माण संस्थेतील तसेच बैठ्या घरातील नागरिकांना कमी प्रमाणात पाणी मिळत होते. मात्र, ही पाणी समस्या कायमस्वरुपी निकालात काढण्यास यश मिळाले आहे.**



चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनकडे याबाबत रहिवाशांनी तक्रार केली होती. यावर तात्काळ दखल घेत फेडरेशन मार्फत आमदार महेश लांडगे यांच्याकडे दाद मागण्यात आली. त्यामुळे पाणीपुरवठा अधिकारी यांची 'ऑन दी स्पॉट' बैठक घेण्यात आली.पूर्वी अस्तित्वात असलेली पिंपरी-चिंचवड मनपाची पाण्याची जलवाहिनी छोटी असल्याने व या भागाची लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढल्याने ही छोटी लाईन एवढ्या मोठ्या लोकसंख्येस पाणी पुरवठा करण्यास अपुरी असल्याचे आमदार महेश लांडगे व पिंपरी-चिंचवड मनपाच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. त्यामुळे आमदार लांडगे यांनी ही छोटी लाईन काढून मोठी लाईन टाकण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पिंपरी-चिंचवड मनपाकडून ही छोटी लाईन बदलून मोठी लाईन टाकण्यात आली. त्यामुळे या परिसरातील सर्व गृहनिर्माण संस्थेतील तसेच बैठ्या घरातील नागरिकांना पुरेसे पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

मयुरेश्वर अपार्टमेंटचे अध्यक्ष रामेश्वर गालट म्हणाले की, गुरुदत्त कॉलनी मोशी येथील गृहनिर्माण संस्था तसेच येथिल बैठ्या घरांना पाण्याची खूप समस्या होती. पाणी खूप कमी प्रेशरने येत होते. त्यामुळे आम्हाला रोज टँकरने पाणी विकत घ्यावे लागत होते. आमदार महेश लांडगे यांनी यामध्ये तात्काळ लक्ष घालून पाण्याची जुनी छोटी लाईन बदलून नवी मोठी लाईन टाकून दिली.त्यामुळे आता आमच्या परिसरात जोरात प्रेशरने मुबलक पाणी मिळत आहे. नागरिक यामुळे समाधानी आहेत.

> **फेडरेशनच्या माध्यमातून ज्या-ज्या समस्या आमदार महेश लांडगे यांच्याकडे आम्ही घेऊन गेलो. त्या सर्व समस्या आमदार लांडगे यांनी सोडवलेल्या आहेत. त्यामध्ये ओल्या कचऱ्याची समस्या असो किंवा पाण्याची समस्या असो आमदार महेश लांडगे यांनी ती सोडवली आहे. पाणी समस्या देखील आमदार महेश लांडगे यांनीच भामा आसखेड येथून २६५ एम.एल.डी.पाणी आणून चिखली येथे जलशुद्धीकरण केंद्र उभारून सोडवलेली आहे. आम्हाला या राजकारणात व आरोप प्रतिआरोपात रस नाही.आमच्यासाठी पाणी समस्या कोणी सोडवली हे महत्वाचे आहे.**
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष,**
> **चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन.**

# पिंपरी-चिंचवडकरांकडून स्वयंस्फुर्तीने "स्वच्छता मोहीम"

## अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ : आयईसी संस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा

पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**स्वच्छतेचे महत्व आता नागरिकांना पटायला लागले असून नागरिक स्वयंस्फुर्तीने स्वच्छता व कचऱ्याचे विलगीकरण मोहिमेत सहभागी होत आहेत. शहरातील प्रत्येक घटकापर्यंत स्वच्छतेबाबत माहिती पोहचविल्यास महापालिकेला स्वच्छतेच्या मोहिमेत नक्कीच यश मिळेल, असा विश्वास अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांनी व्यक्त केला.**




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिर येथे शहरातील स्वच्छता आणि कचऱ्याचे विलगीकरण करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या आयईसी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी मार्गदर्शन करताना श्री. वाघ बोलत होते. यावेळी उपआयुक्त अजय चारठाणकर, स्वच्छ सर्वेक्षण समन्वयक विनोद जळक, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, सोनम देशमुख, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, राजेश आगळे, शितल वाकडे, विजयकुमार थोरात यांच्यासह सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे सहायक आरोग्य अधिकारी, आरोग्य निरीक्षक, महापालिकेचे कर्मचारी, बेसिक्स, डिवाईन, जनवाणी, ऑल इंडिया इन्स्टीटयूट आयईसी संस्थांचे कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांना स्वच्छ सर्वेक्षण क्षमता बांधणी तज्ञ बलजित सिंघ आणि मेट्रिक्स ह्युमन सेक्युरिटी संस्थेचे गोविंद माधव यांनी प्रशिक्षण दिले. प्रारंभी, स्मार्ट सिटी टीमद्वारे अर्बन आऊटकम फ्रेमवर्क अभियानांतर्गत करण्यात येत असलेल्या सिटीझन परसेप्शन सर्वेमध्ये नागरिकांना सहभागी होण्याबाबत आवाहन करण्यासाठी मार्गदर्शन केले.

### दंडात्मक कारवाई गतीमान करणार...

**अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ म्हणाले, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात स्वच्छ सर्वेक्षण २०२३ च्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. कचरा विलगीकरण करणाऱ्या नागरिकांच्या संख्येत कमालीची वाढ झाली आहे. अद्यापही काही नागरिक कचरा विलगीकरण संबंधी सूचनांचे पालन करत नसल्याचे निदर्शनास आले आहे. नागरिकांनी प्रत्यक्ष कचरा विलगीकरण करण्याच्या मोहिमेत सक्रीय सहभाग घेत स्वतःच्या घरात विलगीकरण केलेला कचरा घंटा गाडीत टाकताना वेगवेगळा द्यावा. ओला, सुका, घरगुती घातक, सॅनिटरी वेस्ट आणि प्लास्टिक अशा वेगवेगळ्या कंपार्टमेंटमध्ये टाकावा. याबाबत घंटा गाडी सोबत असलेल्या आय ई सी कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मार्गदर्शन करावे. तसेच घंटा गाडीवर वेगवेगळ्या कंपार्टमेंटमध्ये टाकावयाच्या कचऱ्याचे नागरिकांना स्पष्ट दिसेल अशा पद्धतीने तपशीलवार स्टिकर लावावेत, कचरा विलगीकरण न करणाऱ्या नागरिकांची नोंद करून घ्यावी. सूचना देऊनही कचरा विलगीकरण न करणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्याची प्रक्रिया गतिमान करावी, अशा सूचना देखील त्यांनी यावेळी सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या.**

## संपादकीय »

### महामंदीच्या पडछायेत...

***प्रतिकूलतेचे मळभ कितीही दाटले, आव्हानांनी घेरले तरी परिस्थितीवर धीरोदात्तपणे मात करत मार्गक्रमण सुरूच ठेवायचे असते, अशा ध्येयाने सध्या आपल्या अर्थव्यवस्थेचा गाडा हाकला जात आहे.***

कोरोनोत्तर काळात अनेक देश अर्थव्यवस्थेची गाडी रुळावर आणण्यासाठी धडपडत असताना आपण एकूण महासाथीवर आणि आर्थिक परिस्थितीवर केलेली मात महत्त्वपूर्ण आहे. जागतिक बँकेने भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) वाढीचा वेग ६.९ टक्के राहील, असा अंदाज नव्याने वर्तवला आहे. गेल्या ऑक्टोबरमध्ये तो साडेसात टक्क्यांवरून घटवून साडेसहावर आणला होता. त्यावेळी परकी गंगाजळी काढून घेतली जाणे, रुपयाची घसरण अशी कारणे होती. आता फिच मानांकन संस्थेनेही असेच समाधानकारक चित्र रंगवले आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने बुधवारीच (ता.७) रेपो दरात आणखी ३५ अंशांनी वाढ करीत असल्याचे घोषित केले. त्याचवेळी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी बँकेने योजलेल्या उपाययोजना परिणामकारक ठरत असल्याचे स्पष्ट केले. सलग पाचव्यांदा रेपो दरात वाढ करण्यात आली आहे. याआधी तीनदा ५० आणि एकदा ४० अशी एकूण १९० अंशांनी रेपो दरात वाढ केलेली आहे. अमेरिकी मध्यवर्ती बँकेच्या (फेडरल) तुलनेत, त्यांनी आतापर्यंत याच कालावधीत ३५० अंशांनी वाढ केली आहे, ती कमीच आहे. या निर्णयामुळे गृहकर्जासह सर्व प्रकारची कर्जे महाग होतील, तर ठेवींवरील व्याजदर वाढल्याने ठेवीदारांना दिलासा मिळणार आहे. रिझर्व्ह बँकेचा हा निर्णय अपेक्षेनुसारच आहे. महागाई सहा टक्क्यांच्या खाली येत नाही तोपर्यंत चांगल्या अर्थव्यवस्थेसाठी असे कटू निर्णय घ्यावेच लागतील, हे खरे. कोरोनावर मात करून अर्थकारण रुळावर आणण्याचे, उद्योगांची चाके गतीमान करण्याचे कडवे आव्हान सगळ्याच अर्थव्यवस्थांसमोर आहे. त्यात जगभरातच उधळलेला महागाईचा वारू, बेरोजगारीची समस्या, आगामी काळातील मंदीच्या सावटाची चिंता आणि रशिया-युक्रेन युद्धाने साऱ्या जगासमोर ठाकलेले ऊर्जा संकट आणि अन्न सुरक्षेची समस्या अशा पार्श्वभूमीवर वाटचाल सुरू आहे. चीन, अमेरिका, जपान, जर्मनी या प्रमुख अर्थव्यवस्था वाढीसाठी धडपडत आहेत, त्यांना संभाव्य मंदीची छाया सतावत आहे. त्याचा परिणाम साऱ्या जगाला भोगावाही लागणार आहे. मात्र, त्याच्या धक्क्यांची तीव्रता इतर देशांच्या तुलनेत आपल्याला कमी जाणवेल, असा तज्ज्ञांचा होरा आहे. ही समाधानाची बाब. तरीदेखील गाफील न राहता महामंदीच्या पडछायेतून सहीसलामत सुटण्यासाठी कठोर उपाय योजावेच लागतील. अपेक्षेपेक्षा आपल्या अर्थव्यवस्थेचा वाढीचा वेग कमी आहे, हेही वास्तव आहे.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि तारतम्य







अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे मंगेश पाडगावकर म्हणतात तसे 'तुमचे आमचे सेम असते.' आपल्याला पाहिजे तेव्हा स्वातंत्र्य आणि त्याच वेळी ते दुसऱ्याला नाही, असे 'सोयीचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य' करता येत नाही. सोशल मीडिया हा आता जगण्याचा अविभाज्य भाग बनला आहे आणि या मीडियामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य कायमच ऐरणीवर आलेले असते. प्रदर्शन करायला काही धरबंधच उरत नाही. एक तर स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या जीवनातील चांगल्या-वाईट घटना 'अपडेट' करण्याची घाई, की लगेचच त्यावर चांगल्या वाईट प्रतिक्रियांच्या पाऊस पडणे लगेच सुरू होते आणि या प्रतिक्रियांमध्ये बऱ्याच वेळा 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' हे 'सोयीचे' असते, हे दिसून येते. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर करताना आपले सामाजिक स्थान काय, याचाही अनेक वेळा विसर पडलेला दिसून येतो. म्हणूनच एखादी प्रसिद्ध व्यक्ती जिवंत आहे की नाही येथपासून इतिहासातील वंदनीय व्यक्तींची तुलना, असे कुठलेही विषय येऊ शकतात. ज्येष्ठ कलावंत विक्रम गोखले यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. परंतु आपले मत आणि तेही सर्वांच्या आधी प्रसिद्ध करण्याच्या नादात काही जणांनी गोखले यांच्यावर 'आपले मरण पाहिले म्यां डोळा' अशी वेळ आणली होती आणि ते गेल्यानंतरही भलत्याच व्यक्तींच्या मरणाची 'ब्रेकिंग न्यूज' चालविली होती.

तर असे मत / प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी 'फ्रीडम ऑफ स्पीच अँड एक्स्प्रेशन' या घटनात्मक अधिकारामध्ये काही कायदेशीर बंधने असावीत का, हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयापुढे श्रेया सिंघल विरुद्ध भारत सरकार या याचिकेमध्ये २०१४ मध्येच उपस्थित झाला होता. या केसला पार्श्वभूमी आहे हिंदुहृदयसम्राट (कै.) बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनाची. बाळासाहेबांसारख्या महनीय व्यक्तीच्या निधनानंतर 'मुंबई बंद'ची हाक दिली गेली. मात्र, एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर असा बंद पुकारणे किती योग्य आहे, अशा आशयाची पोस्ट दोन तरुणींनी फेसबुकवर लिहिली. याचे निमित्त होऊन कार्यकर्त्यांच्या भावना अनावर झाल्या आणि चिडून जाऊन त्यांनी मोठी निदर्शने केली. शेवटी पोलिसांनी त्या दोन्ही तरुणींविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम '६६-अ'अन्वये गुन्हा दाखल केला. कोणत्याही स्वरूपातील आक्षेपार्ह व प्रक्षोभक माहिती किंवा एखादी माहिती खोटी आहे, हे माहिती असूनसुद्धा कोणाचा अपमान करण्याच्या दृष्टीने किंवा तेढ निर्माण करण्याच्या दृष्टीने माहिती प्रसारित केली तर संबंधित व्यक्तीविरुद्ध या कलमाखाली तीन वर्षे कैद आणि दंडाची शिक्षा व्हायची. मात्र, पोलिसांच्या या कृतीवर सर्व स्तरांतून टीका झाली आणि ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याची पायमल्ली असल्याची ओरड झाली. अखेर काही स्वयंसेवी संस्थांनी या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सुरुवातीला अंतरिम आदेश देताना सर्वोच्च न्यायालयाने या कलमाखाली अटक करण्याआधी पोलिस आयुक्त किंवा पोलिस महानिरीक्षक यांची लेखी पूर्वपरवानगी असणे बंधनकारक केले.

# आभासी चलनाची समांतर व्यवस्था

**बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रात सध्या सर्वात जास्त चर्चिला जाणारा विषय म्हणजे रिझर्व्ह बँक पुरस्कृत आभासी चलनाची (सीबीडीसी) प्रत्यक्ष व्यवहारांमध्ये झालेली सुरुवात!**



गेल्या आर्थिक वर्षांचा अर्थसंकल्प मांडताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी डिजिटल रुपयाची म्हणजेच मध्यवर्ती बँकेकडून आभासी चलनाची सुरुवात होणार असल्याचे सूतोवाच केले होते. त्याच अर्थसंकल्पात डिजिटल रुपयात किंवा कूट चलनात होणारे व्यवहार हे करप्रणालीत समाविष्ट होतील, असा निर्णयदेखील जाहीर करण्यात आला होता. त्यावेळी प्रत्यक्ष चलनाला पर्याय म्हणून मध्यवर्ती बँकेचे चलन हे चलन असेल का? पर्यायाने त्यावर मध्यवर्ती बँक आणि सरकारचे नियंत्रण असेल का? तसेच कूट चलन आणि बँक पुरस्कृत आभासी चलन समान असेल का? अशा विविध मुद्द्यांवरील चर्चा गेल्या वर्षभरात घडून आली आणि त्यातून कूट चलन व आभासी चलनाविषयी बरेच विचारमंथन झाले. आजवर आंतरराष्ट्रीय बाजारात कूट चलनाचा प्रसार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झाला असून किरकोळ गुंतवणूकदार बऱ्याचदा कूट चलनात गुंतवणूक करतात. भारतीय गुंतवणूकदारांमध्ये याविषयी आवश्यक तेवढी जागरूकता अद्याप निर्माण झालेली नाही. मध्यवर्ती बँकेच्या नियामक यंत्रणेला वळसा घालून अनियंत्रित आभासी चलन वित्तीय देवाणघेवाणीसाठी वापरणे, हीच मुळात नव्या युगाची नांदी ठरली आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे अशा प्रकारच्या व्यवहारांना गती आली. अगदी किरकोळ गुंतवणूकदारसुद्धा विविध ॲप्सच्या माध्यमातून कूट चलनात गुंतवणूक करू लागले आणि पाहता पाहता या चलनातून निर्माण झालेल्या गुंतवणुकीचा पसारा प्रचंड वाढला. वित्तीय बाजाराच्या नेहमीच्या वैशिष्ट्यानुसार हा कृत्रिमरीत्या निर्माण झालेला फुगा अगदी अलीकडे मागच्या दोन महिन्यांत फुटला आणि कूट चलनात होणारी गुंतवणूक ही २०-३० टक्क्यांनी घसरली.

तेलाच्या वाढत्या किमती, युरोपातील देशांत निर्माण झालेली मंदीसदृश परिस्थिती, मागणीची अस्थिरता, रोजगारकपात या सर्व कारणांमुळे अंतिमतः गुंतवणुकीचा ओघ आटला आणि त्यातून कूट चलनातील बाजारात प्रचंड अस्थिरता निर्माण झाली. या अस्थिर वातावरणातच अर्थसंकल्पीय अधिवेशनात घोषणा केल्याप्रमाणे १ नोव्हेंबर २०२२ पासून आपल्या रिझर्व्ह बँकेने मोठ्या आर्थिक व्यवहारांसाठी आभासी चलनाला मान्यता दिली. या निर्णयानुसार सरकारी रोखे व तत्सम व्यवहारांची पूर्तता आभासी चलनाद्वारे होऊ शकेल आणि त्यातून बँकांतर्गत आर्थिक व्यवहार अधिक कार्यक्षमपणे घडू शकतील. रिझर्व्ह बँकेच्या मते यामुळे बँकांतर्गत व्यवहारांचा खर्चदेखील कमी होईल.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## गुजरात विधानसभा निवडणूकीतील विजयानंतर

# कोल्हापुरात भाजपाचा आनंदोत्सव!

### भाजपाचा 156 जागांवर ऐतिहासिक विजय



। मुंबई । महाईन्यूज ।

गुजरात विधानसभा निवडणुकीमध्ये घवघवीत यश मिळाल्याने भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी कोल्हापुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आनंदोत्सव साजरा केला.

फटाक्यांची आतषबाजी करत कार्यकर्त्यांनी गाण्याच्या ठेक्यावर ताल धरत नाचत आपला आंनद व्यक्त केला. मान्यवरांच्या हस्ते साखर पेढे वाटण्यात आले.

भाजपचा विजय असो, देश का नेता कैसा हो नरेंद्र मोदी जैसा हो अशा घोषणा देण्यात आल्या. गुजरात विधानसभा निवडणूक भाजपा, काँग्रेस आणि आप अशी तिरंगा झाली. मात्र, निकालात ही निवडणूक एकतर्फी झाल्याचं पाहायला मिळालं. संपूर्ण ताकद लावून झोकून देणाऱ्या आपला एक अंकी आमदारांसह केवळ खातं खोलता आलं आहे. काँग्रेसच्या जागांमध्येही मोठी घट झालीय आणि भाजपाला १५६ जागांवर ऐतिहासिक विजय मिळाला आहे.

---

## उद्धव ठाकरेंकडून मोदींचं अभिनंदन!

। मुंबई । महाईन्यूज ।

आज जाहीर झालेल्या गुजरात विधानसभा निवडणूकीत भाजपाचा विजय निश्चित झाला आहे. या निवडणुकीत भाजपाने १५० पेक्षा जास्त जागा जिंकत विक्रमी विजय मिळवला आहे. गुजरात विजयाबद्दल मी भारतीय जनता पक्ष आणि पंतप्रधान मोदी यांचे खास अभिनंदन करतो. गुजरातचा विजय विक्रमी आणि ऐतिहासिक आहे... हे अभिनंदनपर शब्द आहेत खुद्द शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे... होय... उद्धव ठाकरेंनी गुजरातच्या निकालानंतर भाजपा आणि पंतप्रधान मोदींचं कौतुक केलं आहे.

गुजरात विजयाबद्दल मी भारतीय जनता पक्ष आणि पंतप्रधान मोदी यांचे खास अभिनंदन करतो. गुजरातचा विजय विक्रमी आणि ऐतिहासिक आहे... हे अभिनंदनपर शब्द आहेत खुद्द शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे... होय... उद्धव ठाकरेंनी गुजरातच्या निकालानंतर भाजप आणि पंतप्रधान मोदींचं कौतुक केलं आहे.

गुजरातबरोबरच हिमाचल प्रदेश विधान सभेचे निकाल लागले आणि तेथे काँग्रेसचा दणदणीत विजय झाला. तर दिल्ली 'मनपा ' निवडणुकीत 'आप'ने भाजपवर मात केली. याबद्दलही ठाकरेंनी काँग्रेस आणि आपचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

---

## ठाकरे परिवाराच्या मागे चौकशीचा ससेमिरा

। । मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज ।

राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबियांनी बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याचा कथित आरोपांची केंद्रीय तपास यंत्रणेमार्फत चौकशी करण्याच्या मागणीवरील निर्णय उच्च न्यायालयाने गुरुवारी राखून ठेवला. त्या आधी ही याचिका केवळ गृहितकांवर आधारित आहे आणि आवश्यक कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब न करता दाखल करण्यात आली आहे, असा दावा करून ती फेटाळण्याची मागणी ठाकरे कुटुंबीयांतर्फे करण्यात आली.



दादरस्थित गौरी भिडे यांनी ही याचिका केली आहे. मुंबई पोलिसांत तक्रार देऊनही कारवाई न झाल्याने याचिका केल्याचा दावा भिडे यांनी केला आहे. न्या. धीरज ठाकूर आणि वाल्मिकी मेनेझिस यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी याचिककर्ती आणि ठाकरे कुटुंबीयांचे थोडक्यात म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने याचिकेवरील निर्णय राखून ठेवला.

या प्रकरणात मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभागाने तक्रारीची चौकशी सुरू केली आहे, अशी माहिती राज्य सरकारने न्यायालयाला दिली. मात्र, अशा प्रकारची चौकशी सुरू केल्याचे मला कळवण्यात आले नसल्याची भुमिका याचिकाकर्त्यांने न्यायालयात मांडली आहे. तर याचिकेवर निर्णय राखून ठेवल्यावर सरकारने हे वक्तव्य करणे म्हणजे कायदेशीर प्रक्रियेचा दुरुपयोग असल्याचा आरोप ठाकरे कुटुंबीयांनी केला आहे.

याचिकेत केंद्र सरकार, राज्य सरकार, सीबीआय, ईडीसह उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, आदित्य आणि तेजस ठाकरे यांनाही याचिकेत प्रतिवादी करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणी ईडी आणि सीबीआयमार्फत सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली आहे.

---

# विवारी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री सोलापुरात?

## गुरव समाजाचे रविवारी राष्ट्रीय महाअधिवेशन

। सोलापूर। महाईन्यूज ।

विजयपूर रोडवरील शासकीय मैदानावर रविवारी (ता. ११) दुपारी एक वाजता गुरव समाजाचे राष्ट्रीय महाअधिवेशन होणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड आदी उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

गुरव समाजाचे पहिले राष्ट्रीय महाअधिवेशन पंढरपूर येथे १९९९ मध्ये पार पडले होते. या अधिवेशनास तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यानंतर तब्बल २३ वर्षानंतर गुरव समाजाचे दुसरे राष्ट्रीय महाअधिवेशन सोलापुरात होत आहे. त्याची जय्यत तयारी सध्या सुरु असल्याची माहिती स्वागताध्यक्ष विजयराज शिंदे, नियोजन समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन ढेपे, राष्ट्रीय महासचिव मल्लिकार्जुन गुरव यांनी दिली. मराठा समाजाच्या धर्तीवर गुरव समाजासाठी संत काशिबा महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, अनेक मंदिरातील पुजाऱ्यांवर गावातील गुंड प्रवृत्तीचे लोक अन्याय करतात. त्यापासून त्यांना संरक्षण देण्यात यावे. पत्रकारांच्या धर्तीवर स्वतंत्र संरक्षण कायदा करावा, ज्या देवस्थानात उपन्न नाही, तेथील पुजाऱ्यांना दरमहा २५ हजारांचे मानधन द्यावे. तसेच राज्यातील देवस्थान शासकीय समितीवर गुरव समाजाला प्रतिनिधित्व देण्यात यावे. गुरव समाजाच्या नावावरील इनामी जमीनी खालसा करून त्यांना पीककर्ज व विमा योजनेचा लाभ मिळवून द्यावा या प्रमुख मागण्या गुरव समाजाच्या वतीने सरकार दरबारी मांडण्यात येत आहेत.



### एक लाख लोक उपस्थित राहतील

**गुरव समाजाच्या अधिवेशनात सध्या राज्यभरात बैठकांचे सत्र सुरु आहे. या महाअधिवेशनास किमान एक लाख गुरव समाज बांधव उपस्थित राहतील, असा विश्वास महाअधिवेशनाच्या नियोजन समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन ढेपे यांनी व्यक्त केला.**

# गुजरातमध्ये भाजपचे "कमळ"!




| | |
|---|---|
| 182 | एकूण जागा |
| 182 | जाहीर निकाल |
| 156 | भाजप |
| 016 | काँग्रेस |
| 005 | आप |
| 004 | इतर |




| | |
|---|---|
| 68 | एकूण जागा |
| 68 | जाहीर निकाल |
| 40 | काँग्रेस |
| 25 | भाजप |
| 03 | इतर |

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गुजरातमध्ये सलग पाचव्यांदा सत्ता संपादित करण्यात भाजपला यश आले आहे.तर हिमाचलमध्ये मतदारांनी भाजपला झिडकारुन काँग्रेसला साथ दिली आहे. देशभरातील पोटनिवडणुकांमध्ये मात्र भाजपला मोठा फटका बसल्याचे दिसत आहे.**



नरेंद्र मोदी गुजरातमध्ये मुख्यमंत्री असताना भाजपने 2002 साली सर्वाधिक 127 जागांवर विजय मिळवला होता.



## भूपेंद्र पटेलच मुख्यमंत्री

दरम्यान,भाजपला घवघवीत यश संपादित करुन देणारे विद्यमान मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याकडेच राज्याचे नेतृत्व सोपविले जाणार आहे.त्यांचा शपथविधी 12 डिसेंबरला मोदी स्टेडियमवर होणार आहे.यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी,गृहमंत्री अमित शाह आदी उपस्थित राहणार आहेत.पटेल हे घाटलोडिया मतदार संघातून सलग दुसऱ्यांदा विजयी झालेले आहेत.

## एक्झीट पोलचे अंदाज फोल

अनेक एक्झिट पोल्सनी हिमाचल प्रदेशमध्ये त्रिशंकू परिस्थिती निर्माण होईल, असा अंदाज वर्तविला होता. या परिस्थितीत भाजप आपली केंद्रातील रसद वापरुन सहजपणे सत्तास्थापन करेल, असे म्हटले जात होते. मतमोजणीच्या सुरुवातीच्या टप्प्यात हा अंदाज खरा ठरतानाही दिसत होता. परंतु, काही तासानंतर हे चित्र पालटले. मतमोजणीच्या सध्याच्या आकडेवारीनुसार, हिमाचल प्रदेशातील एकूण 68 जागांपैकी 40 जागांवर काँग्रेसचे उमेदवार विजयी झालेले आहेत आहेत. भाजपला फक्त 25 जागांपर्यंत मजल मारता आली आहे. तीन जागांवर अपक्ष उमदेवार जिंकले आहेत. हिमाचल विधानसभेत बहुमताची मॅजिक फिगर 35 आहे. त्यामुळे सध्याची परिस्थिती पाहता हिमाचल प्रदेशात काँग्रेस पक्ष सहज सत्तास्थापन करेल,असे दिसत आहे. भाजपकडून आमदार फोडाफोडीचे प्रकार होण्याची शक्यता लक्षात घेऊन काँग्रेसने आमदारांना सिमला किंवा चंदीगडमध्ये एकत्र येण्याचे सुचित केले आहे.

मात्र, यंदाच्या निवडणुकीत भाजपने आपलच हा विक्रम मोडीत काढला आहे. मतमोजणीच्या सध्याच्या आकडेवारीनुसार भाजप 182 पैकी 156 जागांवर विजय मिळविला आहे. काँग्रेसला अवघ्या 16 जागांवरच समाधान मानावे लागले आहे.मोठा गाजावाजा करुन मैदानात उतरलेल्या आप ला दुहेरी संख्याही गाठता आलेली नाही.अवघ्या पाच जागांवर आपचे उमेदवार विजयी झाले आहेत.मात्र एवढा मोठा पराभव होऊनही पक्षाला राष्ट्रीय मान्यता मिळविण्यात केजरीवाल यशस्वी झाले आहेत.

# 'आप'ची देशातील 8 वा राष्ट्रीय पक्ष बनण्याच्या दिशेने वाटचाल...

## दिल्ली, पंजाब आणि गोव्यामध्ये राज्य पक्षाचा आपला मिळाला दर्जा

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

हिमाचल प्रदेश आणि गुजरात विधानसभा निवडणुकीच्या निकालांसाठी मतमोजणी सुरू आहे. मात्र, त्याआधीच आपने स्वतःला राष्ट्रीय पक्ष म्हणून जाहीर केले आहे. आम आदमी पक्षाची दिल्ली, पंजाबमध्ये सत्ता आहे. तसंच, दिल्ली, पंजाब आणि गोव्यामध्ये राज्य पक्षाचा दर्जा या पक्षाला मिळाला आहे. त्यामुळे या पक्षाची वाटचाल आता राष्ट्रीय पक्षाकडे होताना दिसतेय.

दिल्ली महानगर पालिकेवर आपचा झेंडा फडकल्यानंतर संपूर्ण देशाचं लक्ष हिमाचलप्रदेश आणि गुजरात निवडणुकांच्या निकालांकडे आहे. सध्या हाती आलेल्या माहितीनुसार, हिमाचल प्रदेशमध्ये आपने अद्यापही खातं उघडलं नसलं तरीही गुजरातमध्ये १३ टक्क्यांपेक्षा जास्त मते आपला मिळाली आहेत. त्यामुळे आपचा राष्ट्रीय पक्ष होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आपला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाल्यास हा पक्ष देशातील आठवा राष्ट्रीय पक्ष ठरणार आहे.




### देशात राष्ट्रीय पक्ष कोणते?

सध्या देशात सात राष्ट्रीय पक्ष आहेत. भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, बहुजन समाज पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस हे सात पक्ष आहेत. राष्ट्रीय जनता पक्ष आणि जनता दल युनायटेडसारख्या पक्षांना राज्य पक्षांचा दर्जा आहे.

### राष्ट्रीय पक्ष होण्यासाठी निकष काय?

तीन राज्यातील लोकसभा निवडणुकीत २ टक्के जागा जिंकणे
४ राज्यात ६ टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळणे
४ राज्यात २ विधानसभा जागांवर निवडून येणे
यापैकी कोणताही एक निकष जो पक्ष पूर्ण करू शकतो त्या पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा दिला जातो.

### आपची सत्ता कुठे?

१५ वर्षांची भाजपाची सत्ता उलथवून टाकत आम आदमी पक्षाने काल दिल्ली महानगर पालिकेवर पक्षाचा झेंडा फडकावला. तर, दिल्ली विधानसभेवरही आपची सत्ता आहे. पंजाबमध्येही आपची सत्ता असून गोव्यातही आपचे दोन आमदार आहेत.

### देशात तीन दर्जाचे पक्ष

देशात तीन प्रकारचे पक्ष आहेत. राष्ट्रीय, राज्य स्तरीय आणि क्षेत्रीय पक्ष. भारतात सात राष्ट्रीय पक्ष आहेत. तर, ३५ राज्य स्तरीय पक्ष आहेत. तर क्षेत्रीय पक्षांची संख्या ३५० आहे.

हिमाचल प्रदेश आणि गुजरात विधानसभा निवडणुकीच्या निकालांसाठी मतमोजणी सुरू आहे. मात्र, त्याआधीच आपने स्वतःला राष्ट्रीय पक्ष म्हणून जाहीर केले आहे. आम आदमी पक्षाची दिल्ली, पंजाबमध्ये सत्ता आहे. तसंच, दिल्ली, पंजाब आणि गोव्यामध्ये राज्य पक्षाचा दर्जा या पक्षाला मिळाला आहे. त्यामुळे या पक्षाची वाटचाल आता राष्ट्रीय पक्षाकडे होताना दिसतेय.

## सायली संजीवच्या आयुष्यात पहिली पैठणी कशी आली? तिनंच सांगितला भन्नाट किस्सा..



लाखो तरुणांच्या मनाला भुरळ घालणारी अभिनेत्री सायली संजीव गेल्या काही दिवसांपासून बरीच चर्चेत आहे. तिचा 'हर हर महादेव' चित्रपट असो किंवा नुकताच आलेला 'गोष्ट एका पैठणीची' हा चित्रपट.. सध्या संपूर्ण वातावरण सायलीमय झाले आहे. बऱ्याच ठिकाणी ती प्रमोशनसाठी फिरताना दिसतेय. याच निमित्ताने ती 'झी' मराठी वरील 'होम मिनिस्टर' या कार्यक्रमात आली होती. यावेळी तिने तिच्या आयुष्यात पहिली पैठणी कशी मिळाली याचा भन्नाट किस्सा सांगितला.'होम मिनिस्टर'हा कार्यक्रम महाराष्ट्रातच नाही देशभरात लोकप्रिय आहे. या कार्यक्रमाचे आणि पैठणीचे एक वेगळे नाते आहे, या कार्यक्रमात घराघरातल्या गृहलक्ष्मीचा पैठणी देऊन सन्मान केला जातो. अशातच सायलीचा 'गोष्ट एका पैठणीची' हा चित्रपट रिलीज झाला आहे. ज्याची कथा पैठणी भोवती फिरते. याच निमित्ताने सायली 'होम मिनिस्टर' मध्ये आली होती. तेव्हा तिने पैठणीची खास आठवण सांगितली. सायली म्हणाले, 'मी आतापर्यंत एकही पैठणी विकत घेतलेली नाही. कोणतीही नाही. पण तुमचे खूप खूप आभार कारण मला पहिली पैठणी ही होम मिनिस्टरच्या कार्यक्रमात मिळाली होती. मी कधीच संगीत खुर्ची वैगरे कार्यक्रमात भाग घेतला नव्हता.

## 'इथं सिनेमात काम हवं तर...'; पाकिस्तानी अभिनेत्रीनं केली आपल्याच देशाची पोलखोल



सुंदर दिसणं म्हणजे केवळ रंग-रुप इथपर्यंतच ते सीमित नसतं,एका स्टारची ओळख ही त्याच्या टॅलेंटनं होते. पण कदाचित पाकिस्तानातील लोकांना याचा विसर पडला असावा. लॉलीवूड इंडस्ट्रीत आजही स्टार्सला त्यांच्या काळ्या-गोऱ्या रंगाकडे पाहून काम दिलं जातं. हे आम्ही नाही बोलत आहोत,तर पाकिस्तानची प्रसिद्ध अभिनेत्री सबूर अलीनं स्वतः आपल्या देशातील मनोरंजन सृष्टीची पोलखोल केली आहे.

पाकिस्तानी सिनेइंडस्ट्रीची प्रसिद्ध अभिनेत्री सबूर अलीनं एका टॉक शो मध्ये पाकिस्तानी सिनेइंडस्ट्रीची काळी बाजू लोकांसमोर आणली आहे. अभिनेत्रीनं सांगितलं आहे की सावळ्या रंगाच्या स्टार्सला स्क्रीनवर झळकण्याची संधी इथे फार दिली जात नाही. सबूरने या संदर्भात बोलताना सांगितलं आहे की- "मला वाटतं की हे सत्य आहे, पण जसा काळ पुढे सरकतो गोष्टी बदलतात. आता लोक या गोष्टी विरोधात आवाज उठवू लागले आहेत,पण असं घडतं पाकिस्तानच्या सिनेइंडस्ट्रीत हे देखील सत्य आहे".

अभिनेत्री पुढे म्हणाली की- "आम्हालाही मेकअप करून गोरं दिसायला सांगितलं जातं. आम्हाला मेकअप करणाऱ्यांना आदेश दिले जातात की मेकअपचा बेस गोरा असायला हवा,अभिनेत्री गोरी दिसायला पाहिजे. कितीतरी वेळा असं होतं की जर प्रीव्ह्यूमध्ये आमचा रंग थोडा डार्क दिसला तर पुन्हा गोरं करून शॉट घेतला जातो". पाकिस्तानी सिनेमाविषयी सबूर अलीनं खुलासा करत जे काही सांगितलं आहे त्याने सगळेच हैराण झाले आहेत. आणि अर्थातच यामुळे सबंध पाकिस्तानातील लोकांच्या विचार करण्याच्या पद्धतीवर प्रश्न निर्माण केला आहे.

## ब्रेकअप झालंय ? आठवण येतेय... उर्मिला कोठारेची पोस्ट चर्चेत



मराठी सृष्टीतील एक दिलखुलास सेलिब्रिटी कपल म्हणून आदिनाथ कोठारे आणि उर्मिला कोठारे यांच्याकडे पाहिलं जातं. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये दुरावा असल्याची चर्चा रंगली आहे. अशातच आता उर्मिलाने नुकतीचं शेअर केलेली पोस्ट चर्चेत आली आहे. त्यामुळे दोघांच्यातील दुराव्याची पुन्हा एकादा चर्चा रंगली आहे. उर्मिलानं नुकतीच शेअर केलेली एक पोस्ट सध्या चर्चेत आली आहे. उर्मिलानं तिच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, ब्रेकअप झालंय ? अबोला धरलाय ? आठवण येतेय ? खूप त्रास होतोय ना..! कानात हेडफोन्स घाला आणि फक्त फिल करा...' असं उर्मिलाने पोस्टमध्ये म्हटलं आहे.


## सुशांत सिंगची गर्लफ्रेंड रियानं शोधला आता 'बिझनेसमन बॉयफ्रेंड'

बॉलीवूडचा दिवंगत अभिनेता सुशांत सिंग याचं जाणं हे अजुनही त्याच्या चाहत्यांसाठी धक्कादायक आहे. त्याचे चाहते हे नेहमीच त्याच्या आणि त्याच्या कुटूंबियाप्रती सहानुभूती व्यक्त करताना दिसतात. वेगवेगळ्या कारणासाठी सुशांत हा सोशल मीडियावर ट्रेंड होताना दिसतो. आता त्याची गर्लफ्रेंड रिया चक्रवर्तीनं लक्ष वेधून घेतलं आहे. सुशांतचा मृत्यु झाल्यानंतर विविध कारणांसाठी रिया देखील सोशल मीडियावर चर्चेत आली होती. तिच्यावर ड्र्ग्जचे सेवन केल्याचा आरोपही करण्यात आला होता. त्यासाठी तिला एनसीबीनं चौकशीसाठी बोलावले होते. याशिवाय ईडीच्या फेऱ्यातही ती अडकल्याचे दिसून आले होते. आता ती एका वेगळयाच कारणासाठी चाहत्यांच्या चर्चेचा विषय झाली आहे. तो विषय म्हणजे तिचा बिझनेसमन बॉयफ्रेंड.



गेल्या काही दिवसांपासून रिया ही एका उद्योगपतीला डेट करत असल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या आहेत. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार तिला त्या बिझनेसमनशी लग्न करायचे आहे. त्यामुळे ती त्याला डेट करते आहे. त्या उद्योगपतीचे नाव बंटी सजदेह असे आहे. बंटी हा रियलिटी स्टार आणि फॅशन डिझायनर सीमा सजदेहचा भाऊ आहे. त्या गेल्या काही वर्षांपासून मनोरंजनविश्वात सक्रिय आहे. तो चालवत असलेल्या फर्मची सोशल मीडियावर चर्चाही आहे. गेल्या काही दिवसांपासून रिया आणि बंटीच्या अफेयरची चर्चा आहे. असं म्हटलं जातं की या वर्षाच्या सुरुवातीपासूनच ते एकमेकांना डेट करत आहेत. रियाच्या चाहत्यांनी देखील रियाच्या त्या नव्या नात्यावर आनंद व्यक्त केला आहे. तिला वेगवेगळ्या कमेंट करुन शुभेच्छा दिल्या आहेत. ७ ऑक्टोबरला बंटीचा जन्मदिवस होता. त्यावेळी रियाला बंटीच्या पार्टीमध्ये स्पॉट केले गेले होते. काही झालं तरी आपलं नातं हे काही कुणाला सांगायचं नाही असे त्यांनी ठरवले आहे. त्यामुळेच की काय अजुन त्यांचे फारसे फोटो व्हायरल झालेले नाहीत.

अभिनेते मनोज बाजपेयी यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मनोज यांची आई गीता देवी आज (८ डिसेंबर) वृद्धापकाळाने निधन झालं आहे. त्या ८० वर्षांच्या होत्या. गेल्या काही दिवसांपासून गीता देवी आजारी होत्या. अचानक प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना दिल्ली येथील मॅक्स पुष्पांजली रुग्णालयात दाखल करण्यात आलं. उपचारादरम्यान



त्यांनी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. मनोज यांच्या जवळच्या व्यक्तीने संवाद साधताना सांगितलं की, “मनोज यांच्या आईवर एक आठवड्यापेक्षा अधिक काळ रुग्णालयामध्ये उपचार सुरू होते. आज सकाळी त्यांचं निधन झालं.”

# बीसीसीआयचा वाढला ताण!

## आयपीएल 2023 आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल एकाच वेळी

**दोहा । महाईन्यूज । वृत्तसंस्था**




जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यामुळे जगातील सर्वात श्रीमंत भारतीय क्रिकेट बोर्ड अर्थात बीसीसीआयला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. कारण वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप म्हणजेच जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना जूनच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे परदेशी खेळाडूंना आयपीएल २०२३ च्या प्लेऑफमध्ये खेळणे कठीण होऊ शकते.

क्रिकबझच्या वृत्तानुसार, जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची (WTC) फायनल ७ ते ११ जून दरम्यान ओव्हल येथे होण्याची शक्यता आहे. त्याच वेळी, आयपीएल २०२३ दोन महिन्यांहून अधिक काळ चालेल आणि अंतिम सामना मेच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात होऊ शकतो. या स्थितीत वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल आणि आयपीएल प्लेऑफ यांच्यात टक्कर होऊ शकते. त्याच्या तारखा या एकमेकांत अडकलेल्या दिसत आहेत. टी२० आणि मर्यादित षटकांच्या सामन्यामध्ये सध्या इंग्लंड क्रिकेट संघाचा दबदबा सुरू आहे. सध्या या संघाकडे दोन्ही फॉरमॅटचे विश्वचषक विजेतेपद आहे. कसोटी विश्वचषक म्हणजे कसोटी चॅम्पियनशिपमध्ये त्यांचा अजूनही संघ मागे असून अंतिम फेरीपर्यंत पोहोचण्याची फारशी आशा नाही. इंग्लंडने नुकत्याच रावळपिंडीत पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी विजयानंतर भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या अंतिम फेरीत जाण्याच्या आशा वाढल्या आहेत. हे असे घडले आणि यावर जर विश्वास ठेवला तर पुढील वर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात त्याचे आयोजन केले जाऊ शकते.

भारताच्या टी२० टूर्नामेंट इंडियन प्रीमियर लीगमुळे, त्याच्या संघटनेत बदल शक्य आहे. आयपीएल ४ जून किंवा २८ मे पर्यंत खेळता येईल. भारतीय संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचण्याची शक्यता लक्षात घेता हा सामना इतका जवळ ठेवणे कठीण जाईल. नियमांनुसार, आयसीसी स्पर्धेच्या सात दिवस आधी इतर कोणत्याही टूर्नामेंटचे आयोजन केले जाऊ शकत नाही. जर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल ७ ते ११ जून दरम्यान आयोजित केली गेली तर बीसीसीआयला आयपीएल २०२३ ची फायनल ३० मे किंवा त्यापूर्वी आयोजित करावी लागेल. एवढेच नाही तर टीम इंडियाने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत धडक मारली तर आयपीएलमुळे भारतीय खेळाडूंना आयसीसी स्पर्धेच्या तयारीसाठी फारच कमी वेळ मिळेल. कारण त्यांची मानसिक आणि शारीरिक क्षमता कमी झालेली असेल आणि विश्रांतीसाठी त्यांना वेळच मिळणार नाही.

# फायनलमध्ये मेस्सी-रोनाल्डोची टक्कर?

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



अर्जेंटिना-पोर्तुगालची लढत निश्चित

जसजसे अर्जेंटिना आणि पोर्तुगाल विश्वचषकात प्रगती करत आहेत, तसतसे चाहते मेस्सी-रोनाल्डोच्या संभाव्य संघर्षाची अपेक्षा करत आहेत. अंतिम फेरीत अर्जेंटिनासमोर पोर्तुगाल हा संघ असेल, असे त्यांना वाटते.

कतारमध्ये सुरू असलेल्या फुटबॉल विश्वचषकाची प्री-क्वार्टर फायनल झाली आहे. आठ संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले आहेत. अर्जेंटिना, नेदरलँड्स, क्रोएशिया, ब्राझील, इंग्लंड, फ्रान्स, मोरोक्को आणि पोर्तुगालचे संघ पुढे गेले आहेत. अर्जेंटिनाच्या नजरा तिसऱ्यांदा विश्वचषक विजेतेपदावर आहेत. त्याचवेळी, पोर्तुगाल प्रथमच अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी लढत आहे. त्याची सर्वोत्तम कामगिरी १९६६ आणि २००६ मध्ये झाली, जेव्हा संघ अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर होता.

अर्जेंटिना आणि पोर्तुगाल संघ जसजसे प्रगती करत आहेत, तसतसे चाहते मेस्सी-रोनाल्डोच्या संभाव्य संघर्षाची अपेक्षा करत आहेत. अंतिम फेरीत अर्जेंटिनासमोर पोर्तुगाल हा संघ असेल, असे त्यांना वाटते. अशा परिस्थितीत मेस्सी आणि रोनाल्डो हे जगातील दोन महान खेळाडू फुटबॉलच्या सर्वात मोठ्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत आमनेसामने येऊ शकतात. आता हे कसे शक्य आहे, आम्ही तुम्हाला प्रश्नांच्या माध्यमातून येथे सांगत आहोत.

# पहिल्या कसोटी सामन्यासाठी बांगलादेशचा १७ सदस्यीय संघ जाहीर

## भारत आणि बांगलादेश यांच्यात 14 तारखेपासून पहिली कसोटी खेळवली जाणार

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

सध्या भारतीय संघ बांगलादेश दौऱ्यावर असून दोन्ही संघात तीन सामन्यांची वनडे मालिका खेळली जात आहे. या मालिकेत बांगलादेशने दोन सामन्यांनंतर २-० ने विजयी आघाडी घेतली आहे. तसेच मालिकेतील तिसरा सामना बाकी आहे.

अशात बांगलादेश क्रिकेट मंडळाने पहिल्या कसोटीसाठी आपला संघ जाहीर केला आहे. ज्यामध्ये सतरा खेळाडूंचा समावेश असून शाकिब अल हसन संघाचे नेतृत्व करणार आहे.

भारत आणि बांगलादेश यांच्यात १४ तारखेपासून पहिली कसोटी खेळवली जाणार आहे. भारतासाठी अडचण म्हणजे कर्णधार रोहित शर्मा दुखापतग्रस्त आहे. या दौऱ्यावर एकदिवसीय मालिका गमावल्यानंतर टीम इंडियावर कसोटी मालिका जिंकण्याचे दडपण आहे. त्यामुळे पहिली कसोटी अत्यंत महत्त्वाची आहे. पहिला सामना जिंकणारा संघ मालिका गमावण्याच्या धोक्यातून बाहेर पडेल. तसेच बांगलादेशने ८ डिसेंबर रोजी त्यांच्या कसोटी संघाची घोषणा केली.



**बांगलादेशचा पहिल्या कसोटीसाठी संघ:**

महमुदुल हसन जॉय, एमडी मेहदी हसन मिराज, मोहम्मद नजमुल हुसेन शांतो, एमडी तैजुल इस्लाम, मोमिनुल हक, तस्कीन अहमद, यासिर अली चौधरी, सय्यद खालिद अहमद, एमडी मुशफिकुर रहीम, इबादत हुसेन चौधरी, शाकिब अल हसन (कर्णधार), एमडी शोरफुल इस्लाम, लिटन कुमार दास, झाकीर हसन, काझी नुरुल हसन सोहन, रेझाउर रहमान राजा आणि अनामुल हक बिजॉय

# टीम इंडियात नेतृत्व बदलाचे वारे! बांगलादेश दौऱ्यात होणार मोठा बदल

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



टीम इंडियासाठी बांगलादेश दौरा एका खराब स्वप्नापेक्षाही भयंकर राहिला आहे. टीम इंडिया या दौऱ्यात आजून पहिल्या विजयाची वाट पाहत आहे. दुसरीकडे संघाचे अनेक खेळाडू जखमी झाले आहेत. मालिकेतील तिसऱ्या सामन्यात आता टीम इंडिया मोठ्या बदलांसह उतरणार आहे. या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेनंतर टीम इंडियाला बांगलादेशविरुद्ध 2 कसोटी सामने खेळायचे आहेत.

टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माच्या अंगठ्याला गंभीर दुखापत झाली आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक रोहुल द्रविड यांनीही सामन्यानंतर स्पष्ट केले आहे की, तो तिसऱ्या सामन्यात खेळताना दिसणार नाही. टीम इंडिया तिसऱ्या वनडेत नव्या कर्णधारासह मैदानात उतरणार आहे. दुसऱ्या वनडेत रोहित शर्माच्या अनुपस्थितीत केएल राहुलने टीम इंडियाची कमान सांभाळली, अशा परिस्थितीत आगामी सामन्यात फक्त केएल राहुलच कर्णधारपद भूषवताना दिसतो. तो संघाचा उपकर्णधारही आहे.

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यानंतर प्रशिक्षक राहुल द्रविड म्हणाला होता, 'रोहित मुंबईला जाणार आहे आणि त्याच्या बोटाची दुखापत कशी आहे हे तज्ञांना दाखवेल. तो कसोटी मालिकेत खेळू शकेल की नाही हे आम्ही सांगण्याच्या स्थितीत नाही. जर रोहित शर्मा कसोटी मालिकेपूर्वी तंदुरुस्त नसेल तर केएल राहुलला कसोटीतही कर्णधारपदाची संधी मिळू शकते.

केएल राहुलने आतापर्यंत 1 टेस्ट मॅच, 6 वनडे आणि 1 टी-20 मॅचमध्ये टीम इंडियाचं नेतृत्व केलं आहे. या कसोटी सामन्यात टीम इंडियाला पराभवाला सामोरे जावे लागले, एकदिवसीय सामन्यांमध्ये टीम इंडियाने 3 सामने जिंकले आहेत आणि 3 गमावले आहेत, तर केएल राहुलच्या नेतृत्वाखाली खेळलेल्या एकमेव टी-20मध्ये टीमने विजय मिळवला आहे.